




दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25








अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २३१ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । बुधवार २३ /०९/२०२६ । पाने - ६







# वीज प्रश्नावर शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा; तातडीने दुष्काळ जाहीर करा - थोरात

## प्रांताधिकारी नसल्याने आंदोलकांनी कार्यालय दणाणून सोडले






युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शेतकऱ्यांना सुरळीत वीजपुरवठा मिळावा, वीज वितरणातील अनियमितता दूर करावी आणि राज्यात दुष्काळ जाहीर करून शेतकरी व शेतमजुरांना तातडीने मदत करावी, या मागण्यांसाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर येथे शेतकऱ्यांच्या वतीने जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. यशोधन कार्यालयापासून सुरू झालेला हा मोर्चा प्रांताधिकारी कार्यालयावर पोहोचल्यानंतर सभेत रूपांतरित झाला. मात्र, निवेदन स्वीकारण्यासाठी प्रांताधिकारी उपस्थित नसल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले आणि आंदोलकांनी प्रांताधिकारी कार्यालय घोषणांनी दणाणून सोडले.

सध्या राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाअभावी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगत शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडल्या. उपलब्ध पाणीसाठा पिकांना देण्यासाठी वीजपुरवठा सुरळीत असणे आवश्यक आहे. मात्र, मागील काही काळापासून वीजपुरवठा सुरळीत होत नसल्याने पाण्याअभावी पिके अडचणीत आली आहेत. विशेषतः वीज रोटेशनच्या काळातच वीजपुरवठा खंडित केला जात असल्याची तक्रार आंदोलकांनी केली.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी यावेळी संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वीज आणि पाण्याच्या प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची मागणी केली. पठार भाग तसेच तळेगाव परिसरातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील परिस्थिती लक्षात घेऊन सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. दुष्काळामुळे शेतमजुरांनाही रोजगाराची समस्या निर्माण झाली असून, त्यांच्यासाठी रोजगार व मजुरीची व्यवस्था करण्याची गरज असल्याचेही थोरात यांनी नमूद केले.

मोर्चाचे नेतृत्व करणाऱ्या डॉ. जयश्री थोरात यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांचा मोर्चा नियोजित असल्याची माहिती असतानाही संबंधित अधिकारी निवेदन स्वीकारण्यासाठी उपस्थित नसणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी सांगितले. मागील दोन महिन्यांपासून शेतकरी वीजपुरवठ्याच्या समस्येला सामोरे जात असून, वीज मिळावी म्हणून आक्रोश करत असतानाही संबंधित यंत्रणांकडून पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचा आरोप त्यांनी केला.

शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी आणि वीज मिळालीच पाहिजे. अन्यायाविरुद्ध संगमनेरमधील शेतकरी जनता एकत्रितपणे आवाज उठवेल, अशी भूमिका डॉ. जयश्री थोरात यांनी मांडली. राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी शासनाने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, निवेदन स्वीकारण्यासाठी प्रांताधिकारी अरुण उंडे उपस्थित नसल्याने माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी नाराजी व्यक्त केली. प्रांताधिकारी उपलब्ध नसतील तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. डॉ. जयश्री थोरात यांनी प्रांताधिकारी निवेदन घेण्यासाठी येत नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका घेतली.

यानंतर काही आंदोलकांनी पोलिसांचे कडे पार करून प्रांताधिकारी कार्यालयात प्रवेश केला. कार्यालय परिसरात विविध घोषणा देण्यात आल्या. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी आंदोलकांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. काही वेळाने प्रांताधिकारी अरुण उंडे आंदोलनस्थळी उपस्थित झाले. त्यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणा देत प्रशासनाकडे आपल्या मागण्यांची तातडीने दखल घेण्याची मागणी केली. निवेदन स्वीकारल्यानंतरही आंदोलकांनी प्रांताधिकाऱ्यांनी सभेच्या व्यासपीठावर येऊन निवेदन स्वीकारावे, अशी मागणी केली.

(पान ४ वर)

# रसिकांच्या भक्कम पाठिंब्याने ‘संगमनेर फेस्टिव्हल’ यशस्वी : मनीष मालपाणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- सलग अठरा वर्षे संगमनेरमधील कलारसिकांच्या भक्कम पाठिंब्यामुळे ‘संगमनेर फेस्टिव्हल’ यशस्वी होत आला आहे. संगमनेरचा ‘सांस्कृतिक मानबिंदू’ हे बिरुद सार्थ ठरविण्यात रसिकांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आमचाही उत्साह प्रचंड वाढला असून, पुढील वर्षी आणखी दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यासाठी नवे बळ मिळाले आहे, असे प्रतिपादन राजस्थान युवक मंडळाचे अध्यक्ष, संगमनेर फेस्टिव्हलचे जनक मनीष मालपाणी यांनी केले.

गणेशोत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही १६ ते २१ सप्टेंबर या कालावधीत राजस्थान युवक मंडळाने मालपाणी उद्योग समूहाच्या सहकार्याने सहा दिवसीय संगमनेर फेस्टिव्हलचे आयोजन केले होते. सोमवारी ‘नाना थोडं थांबा ना’ या विनोदी नाटकाच्या प्रयोगाने त्याची सांगता झाली. सुमारे साडेतीन हजार रसिकांच्या भरगच्च उपस्थितीत नाटकाच्या मध्यंतरात मनीष मालपाणी बोलत होते. यावेळी मालपाणी फार्मच्या संचालिका, नगरसेविका रचना मालपाणी, मालपाणी उद्योग समूहाचे संचालक गिरीश मालपाणी, सुनीता मालपाणी, मंडळाचे कार्याध्यक्ष सागर मणियार, उपाध्यक्ष कल्पेश मर्दा, सचिव कृष्णा असावा, खजिनदार वेणुगोपाल कलंत्री आदी उपस्थित होते. सत्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन कृष्णा असावा यांनी केले.

यावेळी मालपाणी पुढे म्हणाले की, संगमनेर फेस्टिव्हलचे आयोजन करणे म्हणजे शिवधनुष्य पेलण्यासारखे आहे. मात्र मंडळाचे उत्साही पदाधिकारी आणि कार्यकर्ते महिनाभर नियोजनासाठी परिश्रम घेतात. त्यांच्या मेहनतीचे यंदाही चीज झाले. आयोजनाचा खर्च मोठा असला तरी अनेक दानशूर व्यक्ती उत्स्फूर्तपणे पुढे येतात. त्यामुळे देशभरात नावाजलेले आणि अभिरुचीसंपन्न कार्यक्रम संगमनेरकरांसाठी उपलब्ध करुन देणे शक्य असल्याचे त्यांनी सांगितले.

लोकमान्य टिळकांनी सुरु केलेला गणेशोत्सव केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता ज्ञान, संस्कार आणि समाजप्रबोधन देणारा असावा, याकडे सुरुवातीपासूनच मंडळाने कटाक्षाने लक्ष दिले. याच भूमिकेतून संगमनेर फेस्टिव्हलला वर्षानुवर्षे रसिकांची पसंती मिळत आहे. फेस्टिव्हलच्या यशासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणार्या प्रत्येक घटकाविषयी मनात अपार कृतज्ञता असल्याचेही मालपाणी यांनी यावेळी नमूद केले.

आजच्या समारोपाच्या दिनी ‘नाना थोडं थांबा ना’ या अस्सल ग्रामीण बाजाच्या विनोदी नाटकाने उपस्थित प्रेक्षकांना मनमुराद हसवले. नाटकातील कलाकारांचा तसेच फेस्टिव्हलच्या आयोजनात विशेष योगदान देणार्या मनोज साकी, मुरारी देशपांडे, सचिन गाडे, भारत मोरे, विनायक भोईर आणि यश भंगीरे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. मालपाणी परिवाराच्या वतीने अकरा लाख रुपयांच्या योगदानातून साकारण्यात आलेली ‘संगमनेरच्या राजाची’ देखणी मूर्ती चावडी येथील राजस्थान युवक मंडळाच्या मंडपात विराजमान आहे. या बाप्पाच्या दर्शनासाठी येणार्या भाविकांनी श्रीफळ, फुले किंवा हार आणण्याऐवजी एक वही आणि एक पेन अर्पण करावे, असे आवाहन मनीष मालपाणी यांनी केले.

# राहुल गांधींना घाबरल्याने भाजप बेताल - वडेट्टीवार

मुंबई (वृत्तसंस्था)

भाजपचे नेते आता राहुल गांधींना मिळत असलेल्या पाठिंब्यामुळे घाबरले आहेत. त्यांची राजकीय उंची कमी असताना सुद्धा काही जण राहुल गांधी यांच्यावर टीका करतात. त्यांनी औकात पाहून बोलले पाहिजे, असे म्हणत कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे. सरकार घाबरले असून एसआयआरच्या माध्यमातून विरोधकांची मते गायब करण्याचा यांचा प्रयत्न आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, मंत्री दौरे करत आहेत काजू-बदाम खात आहेत. त्यांना दुष्काळाचे काय देणंघेणं नाही. सरकारकडून चालढकलपणा सुरू आहे. महाराष्ट्र सरकारने कर्नाटक सरकारकडून काही तरी शिकले पाहिजे. कर्नाटक सरकार जर दुष्काळ जाहीर करू शकते तर महाराष्ट्र सरकार कशाची आणि कुणाची वाट पाहत आहे. दिल्लीवाले म्हणतील मग दुष्काळ जाहीर करू असे काही यांच्या डोक्यात आहे का? असा सवाल वडेट्टीवार यांनी केला आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकरी आता रडतो आहे. कोरड्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. मंत्र्यांना घरबसल्या जिल्हाधिकाऱ्यांकडून सर्व माहिती मिळते, दौरे करण्याची काय गरज आहे. ती माहिती मागवली असती तर आता दुष्काळ जाहीर करता आला असता. पण या सरकारच्या नियतीमध्येच खोट आहे, त्यांना शेतकऱ्यांशी काही देणंघेणं नाही.










# सहकारमहर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात महाविद्यालयात वाणिज्य व व्यवस्थापन विषयवारील आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर, आय.क्यू.ए.सी. विभाग आणि वाणिज्य व व्यवस्थापन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वाणिज्य, व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञानातील उदयोन्मुख प्रवाह या विषयावर दि. २६ ते २८ सप्टेंबर २०२६ दरम्यान तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब वाघ यांनी दिली आहे.

या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी भारतासह नेपाळ व मलेशिया येथील तज्ञ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत नेपाळ येथील प्रा.डॉ. ताराप्रसाद, मलेशियातील वरिष्ठ व्याख्याता डॉ.हफिझाह हम्माद अहमद खान, बोडोलँड विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ.धनंजय मांढलिक, आसाम येथील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठाता प्रा.डॉ.आयेकपाम इबेमचा चानू, प्रा.डॉ.किशोर शंकर निकम, डॉ.मंगेश वाघमारे आदी आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेच्या माध्यमातून संशोधक, प्राध्यापक, शिक्षणतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ, संशोधक विद्यार्थी यांना एकत्र आणून वाणिज्य, व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञानातील आधुनिक घडामोडींवर विचारमंथन केले जाणार असून आधुनिक तंत्रज्ञानातील परिवर्तन, नवकल्पना, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच उदयोन्मुख संशोधनाच्या संधी यावर परिषदेत विशेष भर दिला जाणार आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन समारंभ दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वा. महाराष्ट्र राज्याचे माजी महसूल मंत्री, लोकनेते श्री.बाळासाहेब थोरात, संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ.सुधीर तांबे, मा.आ.सत्यजित तांबे आणि एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात, प्रा.डॉ.वाल्मिक सरवदे, संचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र,मुंबई यांच्या उपस्थित संपन्न होणार आहे.

या परिषदेमध्ये लेखांकन व वित्त, उद्योजकता व स्टार्टअप्स, कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग, बँकिंग व वित्तीय सेवा, ई-कॉमर्स, डिजिटल व्यवसाय, करप्रणाली, आंतरराष्ट्रीय व्यवसाय, विपणन, सायबर सुरक्षा, डेटा गोपनीयता, डिजिटल अर्थव्यवस्था, शाश्वत व्यवसाय पद्धती आणि आधुनिक व्यवस्थापन अशा विविध समकालीन विषयांवर विचारमंथन होणार असून या परिषदेमध्ये सादर होणाऱ्या संशोधन पेपरचे आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेमध्ये प्रकाशन करण्यात येणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप दि.२९ सप्टेंबर २०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा.डॉ.पराग काळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.बाळासाहेब वाघ, आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ.लक्ष्मण घायवट, वाणिज्य विभागप्रमुख तथा परिषद समन्वयक प्रा.डॉ.विजय बैरागी, महाविद्यालय प्रशासकीय अधिकारी श्री.गोरक्षनाथ पानसरे, संयोजक प्रा.गणेश थोरात यांनी केले आहे. या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व्यासपीठावर संशोधक, प्राध्यापक, शिक्षक, संशोधन विद्यार्थी, विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांनी सहभागी होऊन आपले संशोधन व विचार मांडावेत असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या.,अहिल्यानगर

**महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता. नगर कार्यालयाशेजारी, अहिल्यानगर, फोन नंबर- २३२६९१४**

Email Id - ahmednagarfederation@gmail.com

**जा.क्र.पतसंस्था फेडरेशन/१०२०/२०२६** **दिनांक २४/०८/२०२६**

### स्थावर मालमत्ता ताबा घेण्याबाबतची नोटीस

**नमुना 'झेड'**

**(नियम १०७ पोट-नियम (११(ड-१) पहा.)**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी **पानोडी परिसर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., पानोडी, ता. संगमनेर, जि.अ.नगर, जि.अ. नगर** व्दाराः **अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अ.नगर,** महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये असुन मागणीची नोटीस ऋणको यांना देऊन नोटीशीमध्ये नमुद केलेली रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांका पासुन आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसुर केली आहे . खाली सही करणा-याने जप्तीची नोटीस दिली असुन, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. आणि सर्व नागरिकांना , खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणा-याने त्याला / तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम १०७ (११(ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. २१/०८/२०२६ दिवशी ताबा घेतला आहे. विशेष करुन ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करु नये. आणि व्यवहार केल्यास **पानोडी परिसर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., पानोडी, ता. संगमनेर, जि.अ.नगर, जि. अ.नगर** यांच्या बोजाची रक्कम आणि होणारे व्याज याला अधीन राहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| अ.क्र. | थकबाकीदाराचे नाव | थकबाकी रक्कम | नोटीस दिनांक | गावाचे नाव | गट क्रमांक भुमापन क्र. | क्षेत्र हे आर चौ.मी. | पुर्व | पश्चिम | उत्तर | दक्षिण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्ज - हजारे म्हाळु महाजु यांची मिळकत व करिता<br>जामि- हजारे महिपती महादु यांची मिळकत<br>जामि- थोरात रामभाऊ सभा यांची मिळकत | दावा रक्कम रू. ४५७४७६/- दि.०१/१०/२०२५ पासुन १४% व्याज + इतर खर्च | मागणी नो.दि. ०६/०१/२०२६ जप्ती नो.दि. २८/०४/२०२६ | पानोडी<br>पानोडी<br>पानोडी ता. संगमनेर | ४८१<br>४८१<br>४८१ | ०.८१.००<br>पो.ख.०.०७.००<br>०.८१.००<br>पो.ख.०.०७.००<br>०.३०.००<br>पो.ख.०.०७.०० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| २ | कर्ज - तळेकर मिनाश्री बाळासाहेब यांची मिळकत व करिता<br>जामि- थोरात गोपाळ किसन यांची मिळकत<br>जामि- जाधव शंकर केसु यांची मिळकत | दावा रक्कम रू. २९७४११/- दि.०१/१०/२०२५ पासुन १४% व्याज + इतर खर्च | मागणी नो.दि. ०६/०१/२०२६ जप्ती नो.दि. २८/०४/२०२६ | पानोडी<br>पानोडी<br>पानोडी ता. संगमनेर | ८०/४<br>१६१/६<br>५३२/२/४ | २.२२.००<br>पो.ख.०.०७.००<br>०.८०.००<br>०.३०.०० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ३ | कर्ज - कदम दिनकर दादा यांची मिळकत व करिता<br>जामि- कदम किसन बळवंत यांची मिळकत<br>जामि- कदम नुतन मधुकर यांची मिळकत | दावा रक्कम रू. ५५०२९८/- दि.०१/१०/२०२५ पासुन १४% व्याज + इतर खर्च | मागणी नो.दि. ०६/०१/२०२६ जप्ती नो.दि. २८/०४/२०२६ | पानोडी<br>पानोडी<br>शिबलापूर ता. संगमनेर | ६५/३<br>६९<br>३०<br>७०<br>७९/४<br>१५०/१ | ०.४३.००<br>०.१७.००<br>०.०४.००<br>०.३६.००<br>०.७५.००<br>पो.ख. ०.०१.००<br>१.१३.०० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ३ | कर्ज - कदम दिनकर दादा यांची मिळकत व करिता<br>जामि- कदम किसन बळवंत यांची मिळकत<br>जामि- कदम नुतन मधुकर यांची मिळकत | दावा रक्कम रू. ५५०२९८/- दि.०१/१०/२०२५ पासुन १४% व्याज + इतर खर्च | मागणी नो.दि. ०६/०१/२०२६ जप्ती नो.दि. २८/०४/२०२६ | पानोडी<br>पानोडी<br>शिबलापूर ता. संगमनेर | ६५/३<br>६९<br>३०<br>७०<br>७९/४<br>१५०/१ | ०.४३.००<br>०.१७.००<br>०.०४.००<br>०.३६.००<br>०.७५.००<br>पो.ख. ०.०१.००<br>१.१३.०० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ४ | कर्ज -तळेकर बाळासाहेब देवराम यांची मिळकत व करिता<br>जामि- तांबे बापुसाहेब कारभारी यांची मिळकत<br>जामि- तळेकर मिनाक्षी बाळासाहेब यांची मिळकत | दावा रक्कम रू. १०४३८४६/- दि.०१/१०/२०२५ पासुन १४% व्याज + इतर खर्च | मागणी नो.दि. ०६/०१/२०२६ जप्ती नो.दि. २८/०४/२०२६ | पानोडी<br>पानोडी<br>पानोडी ता. संगमनेर | १०/२<br>६६/४<br>८०/४ | ०.५२.००<br>पो.ख. ०.०४.००<br>०.३५.००<br>२.२२.००<br>पो.ख. ०.०७.०० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ५ | कर्ज - मधे यशवंत शंकर यांची मिळकत व करिता<br>जामि- मधे भाऊराया उर्फ भाऊराव रामभाऊ यांची मिळकत<br>जामि- मधे लक्ष्मण पांडु उर्फ पांडुरंग यांची मिळकत | दावा रक्कम रू. ३५३७५७/- दि.०१/१०/२०२५ पासुन १४% व्याज + इतर खर्च | मागणी नो.दि. ०६/०१/२०२६ जप्ती नो.दि. २८/०४/२०२६ | पानोडी<br>पानोडी<br>पानोडी ता. संगमनेर | १८८/६<br>१८७/५ पैकी<br>१८८/९ | २.००.००<br>२.००.०० पैकी<br>२.००.०० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |

**स्थळ - अ. नगर**
**दिनांक - २४/०८/२०२६**

**(सही)**
**जे. डी. काळे,**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**अहमदनगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मार्या, अ.नगर**



# संगमनेरला २०० रोहित्रांचा दिलासा

## शेतकऱ्यांवर आर्थिक भार न टाकता नादुरुस्त रोहित्र बदलण्याची कार्यवाही




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारनियमनाच्या संकटामुळे त्रस्त झालेल्या संगमनेर तालुक्यातील शेतकरी आणि ग्रामीण भागाला मोठा दिलासा मिळाला आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या पाठपुराव्यामुळे तालुक्यासाठी सुमारे २०० रोहित्रांची उपलब्धता झाली असून, नादुरुस्त रोहित्र अल्पावधीत बदलण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, रोहित्र जळाल्यानंतर ते बदलण्यासाठी शेतकऱ्यांवर कोणताही आर्थिक भार टाकण्यात आलेला नाही.

मागील काही दिवसांपासून तालुक्यात भारनियमनाचा प्रश्न गंभीर बनला होता. अनेक ठिकाणी रोहित्र नादुरुस्त झाल्याने शेतीपंपांसह ग्रामीण भागातील वीजपुरवठा खंडित होत होता. त्यामुळे नवीन रोहित्र बसविणे तसेच विद्यमान रोहित्रांवरील वाढता वीजभार कमी करण्यासाठी अतिरिक्त रोहित्र उपलब्ध करून देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत होती.

शेतकऱ्यांच्या या अडचणीची दखल घेत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून तालुक्यासाठी १२५ रोहित्र उपलब्ध करून देण्यात आले. तर आमदार अमोल खताळ यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ८० रोहित्र नव्याने बसविण्यात आले आहेत. १ ऑगस्ट ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मागणीनुसार रोहित्र उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात आली. आणखी ४० रोहित्र काही दिवसांत उपलब्ध होणार असल्याची माहिती आमदार खताळ यांनी दिली.

तीन गावांच्या वाड्या-वस्त्यांवर प्रथमच उजेड तालुक्यातील डोळासणे, मेंढवण आणि मेंगाळवाडी येथील काही वाड्या-वस्त्यांना अनेक वर्षांपासून वीजपुरवठ्याची प्रतीक्षा होती. रोहित्र उपलब्ध झाल्याने या भागात प्रथमच वीज पोहोचली असून, ग्रामस्थांच्या जीवनात उजेड आला आहे. शेती, पिण्याचे पाणी आणि दैनंदिन गरजांसाठी वीज उपलब्ध झाल्याने या भागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी असल्याने उपलब्ध पाण्यावर शेतीचे नियोजन करावे लागत आहे. त्यामुळे सिंचनासाठी वीजपुरवठा सुरळीत असणे अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. गावठाण फिडरवर कृषी पंपांसाठी एजी फिडर जोडले जात असल्याने सायंकाळी ६ ते ९ या वेळेत भारनियमनाचा अतिरिक्त ताण निर्माण होत होता.

हा ताण कमी करण्यासाठी गावठाण आणि कृषी फिडर स्वतंत्र करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच गावठाण फिडर सिंगल फेज करण्याबाबत तातडीने सर्वेक्षण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील वीजपुरवठा अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. रोहित्रांची मोठ्या प्रमाणात उपलब्धता, नादुरुस्त रोहित्रांची तातडीने दुरुस्ती व बदली आणि फिडर स्वतंत्र करण्याच्या प्रक्रियेमुळे संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना भारनियमनाच्या संकटातून काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# विखे पाटलांनी जपली माणुसकीची नाळ

## मनोज जरांगे यांची भेट घेऊन विचारपूस; डॉ. अशोकराव ढगे यांच्याकडून कौतुक

युवावार्ता (प्रतिनिधी)

नेवासा - आंदोलन हा लोकशाहीचा अविभाज्य घटक असून, जनतेच्या मागण्या शासनासमोर मांडणे हा संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार आहे. लोकशाहीच्या या प्रक्रियेत मतभेद असले तरी मनभेद नसावेत, याचे आदर्श उदाहरण महाराष्ट्राचे ज्येष्ठ कॅबिनेट मंत्री तथा संबंधित उपसमितीचे अध्यक्ष नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आपल्या कृतीतून घालून दिले आहे, असे प्रतिपादन कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी केले.

सप्टेंबर २०२६ मध्ये मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी तीव्र आंदोलन केले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या वतीने डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी परिस्थिती हाताळताना संवाद व लोकशाही प्रक्रियेला महत्त्व दिले.

दरम्यान, मनोज जरांगे यांनी सलग १९ दिवस उपोषण केल्याने त्यांची प्रकृती खालावली असून, छत्रपती संभाजीनगर येथील गॅलेक्सी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. १९ सप्टेंबर २०२६ रोजी डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी रुग्णालयात जाऊन जरांगे यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. राजकीय व आंदोलनात्मक मतभेद बाजूला ठेवून त्यांनी दाखविलेली ही संवेदनशीलता माणुसकीचा आदर्श ठरणारी आहे, असे डॉ. ढगे यांनी म्हटले.



आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांशी मतभेद असले, तरी त्यांच्या आरोग्याची व जीविताची काळजी घेणे ही मानवी संवेदनशीलता आहे. विरोधी विचारांच्या व्यक्तीशीही आदराने वागण्याची लोकशाही मूल्ये डॉ. विखे पाटील यांच्या या कृतीतून अधोरेखित झाली आहेत. मतभेदांच्या पलीकडे जाऊन माणुसकी जपण्याचा हा दृष्टिकोन समाजासाठी निश्चितच अनुकरणीय आहे, असेही डॉ. ढगे यांनी सांगितले.

लोकशाहीमध्ये संघर्ष, आंदोलने आणि विचारभिन्नता अपरिहार्य आहेत; मात्र या सर्व प्रक्रियेत संविधानिक मूल्ये, संयम, संवाद आणि परस्पर आदर कायम राहणे आवश्यक आहे. डॉ. विखे पाटील यांनी जरांगे यांच्या प्रकृतीची रुग्णालयात जाऊन घेतलेली विचारपूस ही याच लोकशाही मूल्यांची प्रचिती देणारी असल्याचे डॉ. अशोकराव ढगे यांनी नमूद केले.

# कोतुळ आदिवासी संस्थेच्या सात संचालकांवर अपात्रतेची कुऱ्हाड

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्यातील आदिवासी विभागातील महत्त्वाची आणि सर्वात मोठ्या संस्थांपैकी एक असलेल्या कोतुळ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या सात विद्यमान संचालकांवर कर्ज थकबाकीच्या कारणावरून अपात्रतेची कारवाई करण्यात आली आहे. सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक अमोल वाघमारे यांनी शुक्रवारी याबाबत आदेश जारी केला. या कारवाईत संस्थेचे विद्यमान चेअरमन विशाल नामदेव गोडे तसेच माजी चेअरमन व विद्यमान संचालक रघुनाथ गेनू जाधव यांचा समावेश असल्याने कोतुळसह अकोले तालुक्यातील सहकार क्षेत्रात खळबळ उडाली.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ क-अ (१) मधील पोटकलम (१)(ब) नुसार ही कारवाई करण्यात आली आहे. आदेशानुसार, संबंधित संचालक हे संस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या थकबाकीत असल्याने समिती सदस्य अथवा संचालक म्हणून पदावर राहण्यास अपात्र ठरत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. कारवाई झालेल्या संचालकांमध्ये विशाल नामदेव गोडे यांच्याकडे ६२,५००, रघुनाथ गेनू जाधव ७५,०००, संदीप रघुनाथ लेंभे १,००,०००, बाळासाहेब लक्ष्मण लेंभे १,२१,७०१, भागा गंगाराम शेळके २५,०००, उषा नामदेव गोडे २,२५,००० आणि सुगंधाबाई नामदेव बांबळे १,१२,५०० इतकी थकबाकी आहे. या प्रकरणाला सुरुवात ८ जुलै २०२६ रोजी झाली. सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी बी. जे. देशमुख व अन्य दोघांनी सहाय्यक निबंधकांकडे तक्रार अर्ज दाखल करून संस्थेचे बहुसंख्य समिती सदस्य ३१ मार्च २०२६ अखेर थकबाकीत असल्याचा दावा केला होता. संबंधित संचालकांवर कायद्यानुसार कारवाई करून त्यांचे समिती सदस्यपद रद्द करण्याची मागणी करण्यात आली होती. तक्रारीनंतर या प्रकरणाची ३० जुलै, १८ ऑगस्ट आणि ३ सप्टेंबर २०२६ रोजी सुनावणी झाली. संबंधित समिती सदस्यांना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली. सुनावणीदरम्यान मांडण्यात आलेली बाजू, उपलब्ध वस्तुस्थिती आणि कायद्यातील संबंधित तरतुदींचा विचार केल्यानंतर सहाय्यक निबंधक अमोल वाघमारे यांनी सात संचालकांविरोधात अपात्रतेचा आदेश जारी केला.



**संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**
**सं.न.प.जा.क्र./आरोग्य ०४/२०८५/२०२६**
**दिय २२/०९/२०२६**

## जाहीर सूचना

संगमनेर शहरातील तमाम खाजगी भूखंड धारकांना कळविण्यात येते की, संगमनेर शहरात व उपनगरात ज्यांच्या मालकीचे खाजगी भूखंड / मोकळी जागा अस्वच्छ आहेत त्यामध्ये वेड्या बाभळी वाढून, झाडे झुडपे व गवत वाढल्याने तेथे पावसाचे पाणी व घाण पाणी जमा होऊन डासांची उत्पत्ती स्थाने तयार झालेली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या ठिकाणी कचरा पडत असल्यामुळे दुर्गंधी निर्माण होऊन परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोकादायक परिस्थिती निर्माण झालेली आहे. अशा भूखंड धारकांनी आपली खाजगी मालकीचे भूखंड / मोकळी जागा तातडीने हि जाहीर सूचना प्रसिद्धी केलेपासून सात दिवसाच्या आत स्वखर्चाने स्वच्छ करून घ्यावेत. तसे न केल्यास नगरपरिषदेमार्फत दंडात्मक कारवाई करणेत येईल तसेच सदरील दंड वसुलीकामी मालमत्ता रजिस्टरला बोजा नोंदवून मालमत्ता करातून करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**(दयानंद गोरे)** मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर
**(नूर मोहम्मद शेख)** उप नगराध्यक्ष, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर
**(डॉ. मैथिली तांबे)** नगराध्यक्ष, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे
मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे
मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# तायक्वांदोमध्ये जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलची दमदार कामगिरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेरच्या विद्यार्थ्यांनी तायक्वांदो क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. तालुकास्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करणाऱ्या शाळेच्या तीन विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यामध्ये सोहम जगन गवांदे - इयत्ता नववी, अनुष्का शैलेश गाडेकर - इयत्ता दहावी आणि शिवानी जालिंदर मुळे - इयत्ता दहावी या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. तिन्ही विद्यार्थ्यांनी स्पर्धेदरम्यान आत्मविश्वास, चपळता, शिस्त आणि





क्रीडा कौशल्याचे उत्तम प्रदर्शन केले. सातत्यपूर्ण सराव आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी तालुकास्तरीय स्पर्धेत आपली गुणवत्ता सिद्ध केली.

तायक्वांदो हा विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकाग्रता, आत्मविश्वास, शारीरिक तंदुरुस्ती आणि आत्मसंरक्षणाची जाणीव निर्माण करणारा महत्त्वपूर्ण क्रीडा प्रकार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रालाही विशेष प्रोत्साहन दिले जाते. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी आणि आपले कौशल्य विकसित करण्यासाठी शाळेच्या वतीने सातत्याने मार्गदर्शन केले जाते. या तीन विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय निवडीमुळे शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेतही तिन्ही विद्यार्थी आपल्या उत्कृष्ट कामगिरीची परंपरा कायम ठेवतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या उल्लेखनीय यशाबद्दल कैलासवासी शंकरराव शेवाळे पाटील प्रतिष्ठान, शाळेचे पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, समन्वयक, क्रीडा शिक्षक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने सोहम जगन गवांदे, अनुष्का शैलेश गाडेकर आणि शिवानी जालिंदर मुळे या तिन्ही विद्यार्थ्यांचे तसेच यांना मार्गदर्शन करणारे शाळेतील समन्वयिका सौ प्रियांका गजेंद्र कर्डिले यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. तसेच आगामी जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी तिन्ही विद्यार्थ्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शाळेतील सर्वांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# प्रतीक्षा म्हस्के रहाणे यांना पीएच. डी. प्राप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी च्या प्राध्यापिका प्रतीक्षा म्हस्के तथा प्रतिक्षा अक्षय रहाणे यांनी मोनाड यूनिवर्सिटी ची फार्मसी मधील विद्यावाचस्पती ( पीएच. डी) ही पदवी प्राप्त केली आहे.

प्रतिक्षा म्हस्के या मातोश्री राधा फार्मसी कॉलेजच्या फार्माकॉग्नोसी या विषयाच्या प्राध्यापक असून त्यांनी हर्बल रेमिडीज इन डायबेटिक नेफ्रोपॅथी सिस्टम या विषयावर आपला प्रबंध सादर केला होता. वर्ष २०२२ ते २०२६ या कालावधीत त्यांनी डॉ.गरिमा



गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली हा शोध प्रबंध सादर केला.

नुकताच त्यांच्या या प्रबंधासाठी विद्यापीठाने त्याना पदवी प्रदान केली आहे. त्यांच्या या यशाने आनंदगड शैक्षणिक संकुलात आणखी एका संशोधक डॉक्टरांची भर पडली आहे. या यशाबद्दल पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजीमंत्री अण्णासाहेब म्हस्के , मा.आमदार वैभव पिचड, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, मा. खा.सदाशिव लोखंडे,संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, सचिव अनिल रहाणे, भारत म्हस्के, अक्षय रहाणे, प्राचार्य डॉ. पल्लवी फलके, प्राचार्य विनोद गिरी, प्रा. विद्याचंद्र सातपुते, प्राचार्य किरण चौधरी, शिवराज वाकचौरे सर्व कर्मचारी आदींनी अभिनंदन केले आहे . दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा.

# महाराष्ट्रात शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघात 5 जागांवर इलेक्शन

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील ५ शिक्षक आणि पदवीधर निवडणुकीबाबत महत्वाची अपडेट आली आहे. निवडणूक आयोगाने राज्यील पाच शिक्षक, पदवीधर निवडणुकीची घोषणा केली आहे. यामध्ये अमरावती, पुणे , नागपूर, औरंगाबाद विभागाचा समावेश आहे. या निवडणुकीसाठी २३ ऑक्टोबर रोजी मतदान होईल. तर याची मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी होईल. निवडणुकीच्या घोषणेमुळे राजकीय हालचालींना वेग येणार आहे.राज्यात आता निवडणुकीचे पडघम वाजणार आहे. महाराष्ट्रातील पाच विधानपरिषदेच्या जागेच्या निवडणुकीची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगाने केली. विधानपरिषदेतील रिक्त होणार्या जागांवर निवडणुका होणार आहेत. या विधानपरिषदेच्या निवडणुकीची चर्चा अनेक दिवसांपासून सुरू आहे. या निवडणुकीसाठी अर्ज प्रक्रिया ही २९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. तर २३ ऑक्टोबर रोजी या जागांसाठी मतदान होणार आहे. तर २७ ऑक्टोबर रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. ५ जागांवर निवडणूक जाहीर करण्यात आल्याने सर्व राजकीय पक्ष आता जोरदारपणे कामाला लागण्याची शक्यता आहे.केंद्रीय आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, बिहारमध्ये विधानपरिषदेच्या ८ जागा रिक्त होणार आहेत. यात ४ शिक्षक आणि ४ पदवीधर मतदारसंघाच्या जागा आहेत. कर्नाटकात २ पदवीधर आणि २ शिक्षक मतदारसंघाच्या जागांवर निवडणूक होईल. तर महाराष्ट्रात विधानपरिषदेच्या ५ जागा रिक्त होत आहेत. यात ३ पदवीधर आणि २ शिक्षक मतदारसंघाचा समावेश आहे. तर उत्तर प्रदेशातही ११ विधानपरिषदेच्या जागांवर निवडणूक होईल. त्यात ५ पदवीधर आणि ६ शिक्षक मतदारसंघाचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील पाच विधानपरिषद सदस्यांचा कार्यकाळ संपत आहे. औरंगाबाद पदवीधर मतदारसंघाचे सतिश चव्हाण, पुणे पदवीधार मतदारसंघात अरुण लाड, नागपूर पदवीधर मतदारसंघाचे अभिजीत वंजारी, अमरावती शिक्षक मतदारसंघाचे किरण सरनाईक, पुणे शिक्षक मतदारसंघाचे जयंत आसगावकर हे प्रतिनिधित्व करत होते.

# टाहाकारीच्या जगदंबा मंदिराच्या इतिहासाला उजाळा

## यादवकालीन शिलालेखामुळे मंदिराची निर्मिती १०व्या-११व्या शतकातील असल्याचे पुरावे

अकोले तालुक्यातील श्रीक्षेत्र टाहाकारी येथील पुरातन जगदंबा माता मंदिराच्या इतिहासावर प्रकाश टाकणारा महत्त्वपूर्ण शिलालेख आढळून आला आहे. मंदिराच्या नदीउताराकडील पायऱ्यांजवळील दगडी खांबावर कोरलेल्या या शिलालेखाच्या वाचनातून यादव वंशातील राजा आईरमदेव यांचा उल्लेख आढळला असून, मंदिराच्या देखभाल व व्यवस्थापनासाठी करण्यात आलेल्या तरतुदींची माहितीही समोर आली आहे. त्यामुळे टाहाकारी येथील मंदिराची निर्मिती यादवकालीन असल्याचे स्पष्ट होण्यास मदत झाली असून, मंदिराच्या इतिहासाला नवा उजाळा मिळाला आहे.

टाहाकारी येथील जगदंबा माता मंदिर हे भव्य दगडी बांधकाम, कोरीव शिल्पे आणि अप्रतिम स्थापत्यकलेसाठी प्रसिद्ध आहे. मंदिराची निर्मिती पांडवांनी एका रात्रीत केली, अशी आख्यायिका परिसरात प्रचलित आहे. मंदिराच्या भव्य दगडी रचनेमुळे या आख्यायिकेला बळ मिळत आले होते. मात्र मंदिराच्या निर्मितीचा नेमका ऐतिहासिक कालखंड स्पष्ट होण्यासाठी ठोस पुराव्याची आवश्यकता होती. मंदिराचा इतिहास उजेडात आणण्यासाठी श्रीक्षेत्र टाहाकारीचे माजी सरपंच व समाजसेवक बाच्छव नरहरी एखंडे यांनी सातत्याने प्रयत्न केले. अखेर मागील महिन्यात मंदिराच्या नदीउताराकडील पायऱ्यांवर असलेल्या एका दगडी खांबावर शिलालेख असल्याचे त्यांच्या व सहकाऱ्यांच्या निदर्शनास आले. या शिलालेखाचे वाचन करून त्यातील इतिहास समोर आणण्यासाठी पुणे येथील इतिहास संशोधक व पुराभिलेख वाचक अथर्व पिंगळे आणि अनिल दुधाने यांच्याशी संपर्क साधण्यात आला.

दोन्ही संशोधकांनी शिलालेखाचे वाचन करून त्याबाबत आपला अभिप्राय दिला आहे. त्यांच्या अभ्यासानुसार या शिलालेखात यादव वंशातील राजा आईरमदेव यांचा उल्लेख असून, त्याच्या काळात मंदिरासाठी तसेच मंदिराच्या व्यवस्थेसाठी करण्यात आलेल्या तरतुदींची माहिती देण्यात आली आहे. देवळाच्या देखभालीसाठी गुरवाची नियुक्ती करून त्यांना काही रक्कम देण्यात आल्याचाही उल्लेख शिलालेखात आहे. शिलालेखाच्या सुरुवातीचा भाग संस्कृत भाषेतील प्रशस्तीचा असून, त्यानंतरचा काही भाग मराठी भाषेत आहे. या शिलालेखात थेट कालोल्लेख नसला, तरी तो यादव राजांच्या प्रारंभिक शिलालेखांपैकी एक असल्याचे संशोधकांचे मत आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या इतिहासाच्या दृष्टीनेही हा शिलालेख अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. शिलालेखात राजा आईरमदेवाची बिरुदावली असून, त्यानंतर मंदिराच्या व्यवस्थापनासंबंधीची माहिती देण्यात आली आहे. प्रारंभिक यादव राज्याचा विस्तार तसेच त्या काळातील मराठी भाषेचा विकास समजून घेण्यासाठी हा शिलालेख महत्त्वपूर्ण ठरणार आहे. राजा आईरमदेव हा चालुक्य राजा सहावा



विक्रमादित्य याचा मांडलिक असल्याचे यापूर्वीच्या ऐतिहासिक संदर्भांतून समोर आले आहे. मात्र टाहाकारी येथील या शिलालेखात राजा विक्रमादित्याचा उल्लेख आढळत नाही. त्यामुळे हा शिलालेख 'अश्वी ताम्रपट'पूर्वीचा आहे की त्यानंतरच्या कालखंडातील आहे, याबाबत अधिक संशोधनाची आवश्यकता आहे.

शिलालेखातील माहितीमुळे टाहाकारी येथील मंदिर समूहाच्या यादवकालीन इतिहासाला महत्त्वपूर्ण आधार मिळाला आहे. संपूर्ण मंदिर समूह हा भूमिज स्थापत्यशैलीतील उत्कृष्ट नमुना असून, येथील शिल्पकला व स्थापत्यकलेचा वारसा अप्रतिम आहे. त्यामुळे टाहाकारीचे जगदंबा माता मंदिर हे केवळ श्रद्धास्थान नसून महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहास, कला व स्थापत्य परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहे. या शिलालेखाचे यापूर्वी अनेक संशोधकांनी वाचन व अभ्यास करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र मंदिराच्या इतिहासाला ठोस संदर्भ मिळणे महत्त्वाचे होते. आता उपलब्ध झालेल्या माहितीमुळे टाहाकारीच्या मंदिर निर्मितीच्या इतिहासाला नवी दिशा मिळाली आहे. या ऐतिहासिक शिलालेखाचे आणि दगडी मंदिराचे जतन करून ते पुढील पिढ्यांसाठी जसेच्या तसे टिकविण्याची जबाबदारी सर्व भाविक भक्त, ग्रामस्थ आणि प्रशासनाने स्वीकारणे गरजेचे आहे.

या ऐतिहासिक कार्यात इतिहास संशोधक व पुराभिलेख वाचक अथर्व पिंगळे व अनिल दुधाने यांच्यासह श्रीक्षेत्र टाहाकारीचे माजी सरपंच व समाजसेवक बाच्छव नरहरी एखंडे, सिन्नर येथील एस.टी. बस वाहक वेणुनाथ नरहरी एखंडे, युवा कार्यकर्ते व समाजसेवक अरुण दत्तात्रय एखंडे, हौसिराम एखंडे, माणिक एखंडे तसेच पुजारी त्र्यंबक गिरी यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या प्रयत्नांमुळे श्रीक्षेत्र टाहाकारीच्या जगदंबा माता मंदिराच्या निर्मिती इतिहासाला महत्त्वपूर्ण उजाळा मिळाला आहे.


**– शांताराम दराडे, अकोले**

# अस्पृश्यता निर्मूलन – एक यशस्वी चळवळ

आपल्या देशात अनेक रूढी राक्षसी स्वरूपात परंपरागत सुरू होत्या, तथापि अनेक महान समाजसुधारकांनी त्याचे निवारण करण्यात यश मिळविले आहे.

राजा राममोहन रॉय यांनी इंग्रज सरकारच्या काळात 'सतीची चाल' बंद करण्यात प्रयत्नांती यश मिळविले. देशाला संतांची व समाजसुधारकांची चांगली देणगी आहे. थोर संतांचे प्रयत्नाला व मार्गदर्शनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे; तथापि संतांच्या मवाळ प्रयत्नातून फलनिष्पत्ती जड समाजात मंद गतीने होते. मात्र महान समाजसुधारकांनी केलेले प्रयत्न प्रभावी होतात. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी.

छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतीराव फुले, वीर सावरकर, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बाबा आढाव, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या धारदार कृतीने अनेक समाजविघातक विचार लोप पावण्यामध्ये क्रांती केली. समाजरचनेमध्ये परंपरागत अस्पृश्यता हा कलंक होता. अस्पृश्यता निर्मूलनाचे काम महात्मा गांधींनी हाती घेतले व डॉ. आंबेडकरांनी त्याला समाजातून हद्दपार केले. महात्मा गांधी स्वातंत्र्याचा लढा चालवताना त्यांचे लक्ष अस्पृश्यता निवारणाकडे होते. एका गावात ते भाषण करत असताना त्यांचे भाषण चालू असताना काही लोक दूर उभे राहून



झाडाखाली भाषण ऐकल होते. गांधींनी विचारले, हे लोक दूर तिकडे का उभे आहेत? इतरांनी सांगितले ते हरिजन आहेत. गांधींनी खडसावून सांगितले, ते जेथे उभे आहेत तेथे जाऊन मी व्याख्यान देणार, ज्यांना यायचे असेल त्यांनी यावे व झटपट कृती केल्यामुळे एकत्रित भाषण झाले. सर्व भारतभर गांधी अस्पृश्यता निर्मूलन चळवळ चालवत असताना मुंबईत आले होते. त्यावेळी काही धनिक उद्योगपतींनी बापूंची भेट घेतली व सांगितले की, आम्ही आपल्या स्वातत्र्य चळवळीसाठी निधी जमा करून आपणास लाखो रुपये देतो. परंतु आपण अस्पृश्यता निर्मूलन चळवळ बंद करावी, गांधी भडकले व म्हणाले, एकवेळ मी स्वातत्र्य चळवळ सोडू शकतो, परंतु अस्पृश्यता निवारण चळवळ सोडणार नाही. शाहू महाराजांनी अनेक कृतीशिल उपक्रम राबवून अस्पृश्यता निर्मूलन करण्यात सिंहाचा वाटा उचलला, महात्मा फुलेंनी समाजव्यवस्थेवर घणाघाती टीका करून प्रभावी विचाराचा पासा उभा केला. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण क्रांतीबरोबर समाज सुधारण्यासाठी व एकोपा निर्माण करण्याचे अद्वितीय काम केले. संत गाडगे महाराज महाराष्ट्रभर फिरताना समाजात समतेसाठी झगडले. जनजागृतीबरोबर लोकशिक्षण झाल्यामुळे अस्पृश्यता निर्मूलन घडत गेले. डॉ. बाबासाहेबांनी ओळखले की, अस्पृश्यता निर्मूलनासाठी कडक कायद्याची गरज आहे आणि त्यामुळे त्यांनी समता प्रस्थापित करण्यासाठी 'अॅट्रॉसिटी' कायद्याचा समावेश केला. आज समाजामध्ये असे आढळते की, अस्पृश्यता निर्मूलनाला चांगले यश मिळाले आहे. समाजावर होणारा अन्याय चांगला दूर झाला आहे. नदीकाठावर एक गाव एक पाणवठा, मंदिर प्रवेश, जातीयभेद संदर्भीय व वाईट प्रथा समाजात गाडली गेली आहे. अस्पृश्यता निवारणामुळे अनेक चांगले फायदे झाले असून, समाज एकात्मता वाढली आहे. या चळवळीचे यश अभिमानास्पद व देशाला गौरवशाली आहे. एकरूप राष्ट्रप्रेमासाठी समानतेसाठी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**सामाजिक एकोपा व समाजिक समरसतसाठी जात, पंथ व धर्म भेद नष्ट करून भारतात समान नागरी कायदा यावा. संविधनानुसार पुढील ५० वर्षात आरक्षण विषय संपविण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरीकाने कर्तव्य करणे देशाच्या हिताचे आहे. सर्व जात धर्म समभाव यावा**



**प्राचार्य डॉ. अशोकराव ढगे**
**नेवासा, मो. ९५११७७९१६८**

# काटकसरीमुळे अमृतसागर दूध संघाची प्रगतीकडे वाटचाल - चेअरमन वैभवराव पिचड

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अमृतसागर सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघाचा कारभार अत्यंत काटकसरीने सुरू असल्याने संघाची प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे, असे प्रतिपादन संघाचे चेअरमन तथा माजी आमदार वैभवराव पिचड यांनी केले. अमृतसागर दूध संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

वैभवराव पिचड यांनी सन २०२५-२६ या वर्षात संघाने केलेल्या कामांचा आढावा सादर केला. सर्व संचालकांच्या पाठपुराव्यामुळे किसान संपदा योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्प तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून स्टोरेज टँक (सायलो) आणि बल्क कुलर संयंत्र मिळाल्याची माहिती त्यांनी दिली. ब्राह्मणवाडा येथील दूध शीतकरण इमारतीसाठी शासनाने निर्धारित केलेली ९७ लाख रुपयांची रक्कम संघाने परतफेड केली असून, अकोले येथील दूध शीतकरण इमारतीसाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू असल्याचेही ते म्हणाले.

अन्न व औषध प्रशासन



आयुक्त तुकाराम मुंढे यांनी कायद्याची कठोर अंमलबजावणी केल्याने दुधाच्या गुणवत्तेत सुधारणा झाली असून भेसळीवर नियंत्रण आले आहे. याचा मोठा फटका खाजगी व्यावसायिकांना बसला असून, ही बाब सहकारी दूध संस्थांच्या पथ्यावर पडली आहे. त्यामुळे या सभेत आयुक्त मुंढे यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच, त्यांची या विभागातून बदली होऊ नये यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

अहवाल सालात दिवंगत झालेल्या मान्यवरांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अहवाल सालात संघाला सर्वाधिक दूध पुरविणाऱ्या उत्पादक शेतकऱ्यांचा आणि सहकारी संस्थांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात संचालक आप्पासाहेब आवारी यांनी संघाच्या ५० वर्षांच्या प्रगतीचा आणि अडचणींवर मात करत केलेल्या वाटचालीचा आढावा घेतला. सभेदरम्यान सयाजी पोखरकर, गणेश पापळ आणि सुनील वाळुंज यांनी संघाच्या पोटनियम दुरुस्तीमधील शब्दरचनेबाबत काही सूचना केल्या. विषयपत्रिकेवरील सर्व विषयांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

या सभेला ज्येष्ठ नेते गिरजाजी जाधव, कचरू शेटे, प्रवीर मालुंजकर, चिमाजी वाळेकर, विठ्ठलराव डुंबरे, सीताराम भांगरे, राजेंद्र देशमुख, सुनील दातीर, सुधाकर देशमुख, राहुल देशमुख, प्रवीण धुमाळ, रवींद्र हांडे, सोपान मांडे, शरद नवले, भाऊसाहेब औटी, संघाचे व्हाईस चेअरमन रावसाहेब वाकचौरे, कार्यकारी संचालक दादाभाऊ सावंत यांच्यासह संचालक गोरक्ष मालुंजकर, आनंदराव वाकचौरे, तसेच दूध संस्थांचे पदाधिकारी, शेतकरी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय...

## पाऊस नाही, पिके संकटात; शेतकऱ्यांच्या डोळ्यात पुन्हा अश्रू

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात यंदा पावसाच्या लहरीपणाने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घातली आहे. पावसाळा सुरू झाला की आकाशाकडे डोळे लावून बसायचे, पहिला पाऊस पडला की पेरणीची लगबग करायची आणि त्यानंतर आभाळाकडे पुन्हा पुन्हा पाहत राहायचे-हा शेतकऱ्यांच्या आयुष्याचा जणू ठरलेला क्रम झाला आहे. यंदाही अनेक भागांत पावसाने सुरुवातीला आशा निर्माण केली; मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्याने उभी पिके संकटात आली आहेत. शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरची आशा आता चिंतेत बदलत आहे. शेतकरी पेरणी करताना केवळ बियाणे जमिनीत टाकत नाही; तो त्याच्यासोबत आपल्या कुटुंबाच्या भविष्याची स्वप्नेही पेरतो. बियाणे, खते, औषधे, मजुरी, मशागत, डिझेल, वीज आणि कर्ज यासाठी पैसा खर्च करून तो पिकाकडे आशेने पाहतो. मात्र पाऊस वेळेवर झाला नाही, तर या संपूर्ण गणिताचा पाया डळमळतो. आज अनेक ठिकाणी हीच परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाचे प्रमाण कमी असणे ही केवळ हवामानाची समस्या नाही; त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर होतो. पिकांना पाणी मिळाले नाही तर उत्पादन घटते. उत्पादन घटले की बाजारातून मिळणारे उत्पन्न कमी होते. उत्पन्न कमी झाले की कर्ज फेडणे कठीण होते. पुढील हंगामासाठी भांडवल उभे करणे अवघड होते. या सगळ्या चक्रात सर्वाधिक भरडला जातो तो अल्पभूधारक शेतकरी. विशेषतः कोरडवाहू भागातील परिस्थिती अधिक गंभीर आहे. विहिरी, तलाव, बंधारे आणि धरणांमध्ये उपलब्ध असलेल्या पाण्यावर शेतकऱ्यांनी नियोजन केले आहे. मात्र पावसाने साथ दिली नाही तर उपलब्ध पाणीसाठा किती दिवस पुरणार, हा प्रश्न आहे. काही शेतकरी ठिबक सिंचन, तुषार सिंचन यांसारख्या उपायांचा वापर करतात; परंतु त्यासाठीही खर्च आवश्यक आहे. आधीच वाढलेल्या शेती खर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक शेतकऱ्याला ही साधने परवडतीलच असे नाही. आज गरज आहे ती केवळ पंचनाम्यांची नाही, तर वेळेत आणि परिणामकारक मदतीची. पिकांचे नुकसान झाल्यानंतर अधिकारी गावात येतात, पंचनामे होतात, कागदपत्रे तयार होतात आणि मदतीची प्रक्रिया सुरू होते. मात्र शेतकऱ्याला नुकसानभरपाई मिळेपर्यंत पुढचा हंगाम दारात येतो. त्यामुळे शासनाच्या मदतीचा वेग आणि प्रत्यक्ष लाभ मिळण्याची प्रक्रिया यामध्ये मोठी दरी राहू नये. पीकविमा योजनाही शेतकऱ्यांसाठी आधार ठरणे अपेक्षित आहे. मात्र अनेकदा विम्याच्या अटी, सर्वेक्षणाची प्रक्रिया, नुकसान निश्चित करण्याची पद्धत आणि प्रत्यक्ष भरपाई यामुळे शेतकऱ्यांच्या मनात नाराजी निर्माण होते. पीकविमा हा कागदोपत्री संरक्षणाचा पर्याय न राहता संकटाच्या काळात प्रत्यक्ष आर्थिक आधार बनला पाहिजे.

दुसरीकडे, शेतीसाठी वीजपुरवठ्याचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. पाऊस कमी असताना उपलब्ध पाण्यावर शेती वाचवण्यासाठी वीज आवश्यक असते. रोहित्र नादुरुस्त झाले, भारनियमन वाढले किंवा वीजपुरवठा अनियमित झाला तर शेतकऱ्याच्या हातातील शेवटचा आधारही निसटतो.

# मालपाणी विद्यालयात श्री गणेशाचे उत्साहात विसर्जन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयात श्री गणेशाची भक्तिमय वातावरणात स्थापना करण्यात आली. संस्थेचे सचिव मा. सतीश लाहोटी, पालक प्रतिनिधी, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत श्रींची विधिवत स्थापना करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेशाची आरती व अथर्वशीर्ष पठणाने झाली. श्री गणेश स्तोत्र व ढोल-ताशांच्या गजरात मंत्रोच्चाराने पूजन करण्यात आले. गणेशोत्सवाच्या सात दिवसांच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी अष्टविनायकांची माहिती, गणेशगीते, विविध उपक्रम तसेच संगीतमय आरतीमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. दररोज श्री गणेशाची आरती व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यालय परिसरात भक्ती, संस्कार आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

सातव्या दिवशी श्रींच्या विसर्जन मिरवणुकीत विद्यार्थी-विद्यार्थिनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले. यावेळी आरती कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नववीच्या विद्यार्थिनींनी सादर केलेले सुंदर गणेश वंदना नृत्य विशेष आकर्षण ठरले. ढोल-ताशांच्या तालावर विद्यार्थ्यांनी उत्साहाने नृत्य करत आनंद व्यक्त केला. संस्थेच्या कार्यकारिणी सदस्या रचनाताई मालपाणी तसेच पालक प्रतिनिधींच्या हस्ते श्री गणेशमूर्तीचे विधिवत विसर्जन करण्यात आले. गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक समिती प्रमुख अंबादास बुलाखे व सहकारी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे गणेशोत्सव भक्तिमय व आनंददायी वातावरणात संपन्न झाला.

# विद्यार्थ्यांनी पालकांचे स्वप्न पूर्ण करावे- प्रा. वसंत हंकारे



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- विद्यार्थ्यांनी क्षणिक आकर्षणाच्या मागे न लागता आपल्या पालकांचे स्वप्न पूर्ण करावे व आयुष्य घडवावे, असे प्रतिपादन समाजप्रबोधक प्रा. वसंत हंकारे यांनी केले. श्रीमंत अवधूत मित्र मंडळ यांनी आयोजित केलेले न समजलेले आई'-बाप' या समाजप्रबोधनात्मक कार्यक्रमात ते बोलत होते.

हा समाज प्रबोधनात्मक महासंवाद राजूर शहराच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासात ऐतिहासिक पर्व ठरला आहे. या कार्यक्रमाला आ.डॉ किरण लहामटे व प्राध्यापक वसंत हंकारे यांच्या हस्ते गणपतीची सुरवातीला पूजा करण्यात आली.हजारांहून अधिक पालक, विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवून एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. सुप्रसिद्ध समाजप्रबोधक प्रा. वसंत हंकारे यांच्या हृदयस्पर्शी आणि ओघवत्या शैलीतील प्रबोधनाने उपस्थित प्रत्येकाचे मन हेलावून सोडले. आपल्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनात प्रा. हंकारे यांनी आई-वडिलांचा जीवनभराचा त्याग, परिश्रम आणि मुलांच्या भविष्यासाठी त्यांनी सोसलेल्या कष्टांची अत्यंत मार्मिक शब्दांत जाणीव करून दिली.

पालकांनी पाल्यांवर केवळ अपेक्षांचे ओझे लादण्यापेक्षा त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संवाद साधावा, तर विद्यार्थ्यांनीही क्षणिक आकर्षणाला बळी न पडता आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कठोर मेहनत घ्यावी, असा महत्त्वपूर्ण संदेश त्यांनी दिला. प्रा. हंकारे यांच्या प्रभावी वक्तव्याने मंडपातील अनेक पालक आणि विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. सध्याच्या डिजिटल युगात व्हॉट्स ॲप, इन्स्टाग्राम आणि फेसबुक यांसारख्या सोशल मीडियाच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीवर त्यांनी विशेष प्रकाश टाकला. अनोळखी व्यक्तींशी मैत्री किंवा मित्रांच्या नात्याने जवळीक साधताना सावधानता बाळगावी, तसेच कोणत्याही भावनिक

जाळ्यात न अडकता अडचणीच्या वेळी पोलिस, शिक्षक आणि पालकांची मदत घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

## शेतकऱ्यांच्या वीज

पान १ वरून -

त्यानंतर माजी मंत्री बाळासाहेब थोरात, डॉ. जयश्री थोरात, रामहरी कातोरे, अजय फटांगरे यांच्यासह कार्यकर्ते व्यासपीठावर आले. प्रांताधिकारी अरुण उंडे, विद्युत मंडळाचे कार्यकारी अभियंता सोनवणे, तहसीलदार धीरज मांजरे आणि डीवायएसपी कुणाल सोनवणे यांनी व्यासपीठावर उपस्थित राहून माजी मंत्री बाळासाहेब थोरात व डॉ. जयश्री थोरात यांच्या हस्ते शेतकऱ्यांचे निवेदन स्वीकारले. आंदोलकांच्या भावना शासनापर्यंत पोहोचविण्यात येतील, असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले. मात्र, वीजपुरवठा, पाणी आणि दुष्काळाच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी आंदोलकांनी कायम ठेवली. जनता सार्वभौम आहे, सरकार जनतेसाठी आहे, अशा घोषणा देत आंदोलकांनी आपल्या मागण्यांचा पुनरुच्चार केला.


Dr.R. S. Gunjal Welfare Foundation

**R. S. Gunjal College of B.Sc Nursing**

Approved By Govt. of. Maharashtra and Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik
At- Gunjalwadi Pathar, Chandanapuri Ghat, Tal- Sangamner, Dist- Ahmadnagar -422620,
Contact. No. 9209873430 8468816440
Email:-dr.rsgunjalbscnursing@gmail.com Website:-www.drrsgibscnursing.org

RECRUITMENT

Application is invited from the eligible candidates for the following posts to the above said college/ institute

| Sr. No | Name of Post | Subject | No.of Post | Qualification | Category |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Principal | Any Speciality | 01 | M.Sc. Nursing/Ph.D | OPEN |
| 2 | Vice- Principal | Any Speciality | 01 | M.Sc. Nursing/Ph.D | OPEN |
| 3 | Associate Professor | 1. Community Health Nursing 2. Psychaiatric | 01 | M.Sc. Nursing | OPEN |
| 4 | Assistant Professor | 1. Medical Surgical 2. Community Health Nursing 3. Psychaiatric 4. OBGY | 03 | M.Sc. Nursing | OPEN |
| 5 | Tutor | | 09 | B.Sc. Nursing / M.Sc. Nursing | OPEN-03 OBC-02 SC-02 SEBC/ EWS-01 VJ (A)/ NT(B) -01 |

Application along with resume and attested photo copies of all relevant certificate must reach to the college within 10 days from the date of advertisement published.

Principal Secretary



Jijamata English Medium School

VACANCIES

| PARTICULARS | POST | QUALIFICATIONS |
|---|---|---|
| Pre Primary Teachers | 2 | H. Sc., D. T. Ed |
| PRIMARY AND SECONDARY | | |
| English, Marathi, Hindi | 1 | H. Sc., D. T. Ed / B.A. / M.A., B.Ed |
| Maths, EVS, Science | 1 | B.Sc./M.Sc. (Maths / Science) B.Ed. |
| Social Studies | 1 | B.A. / M.A., B.Ed (History & Geography) |
| IT Teacher | 1 | B.C.S. / M.C.S, B.C.A. / M.C.A. |
| Physical Director | 1 | B.A., B.P. Ed |
| Special Educator | 1 | B.A. / M.A., B.Ed. in Special Education or equivalent qualification |
| School Counsellor | 1 | B.A. / M.A. Clinical Psychology / Diploma/certificate in School Couselling |
| Dance Teacher | 1 | Diploma/ Degree in Fine Arts Performing Art or Related Field. |
| Music Teacher | 1 | Sangeet Visharad. Proficiency in singing & teaching musical instruments. |
| Art and Craft Teacher | 1 | A.T.D.C.T.C (Minimum 2 years' teaching experience of CBSE / State Board) |

EXCELLENT ENGLISH COMMUNICATION COMPUTER, AI SKILLS ARE MANDATORY

UNIVERSITY STUDENTS ARE HIGHLY ENCOURAGED TO APPLY!

INTERESTED CANDIDATES CAN CONTACT US

9822304638 shewaletrust@gmail.com dr.rahulshewale@gmail.com









## जाहीरात छोटी, प्रतिसाद मोठा

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME MANDA SATISH KANAWADE
TO NEW NAME MANDAKINI SATISH KANAWADE
BY AFFIDAVIT NO 1257/2026 DATE 19/09/2026
ADD- KOTUL ROAD, AT. SAWARCHOL, POST,NIMGAON BK,TAL. SANGAMNER AHILAYANAGAR,422603

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL
Daily Yuvavarta

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME SANDHYA GOVIND PANDHARE
TO NEW NAME SANDHYA SITARAM DHULGANDE
BY AFFIDAVIT NO 1247/2026 DATE 19/09/2026
ADD- DHRUV GLOBAL SCHOOL, MALPANI CAMPUS,AKOLE ROAD, DHANDARPHAL, SANGAMNER AHILAYANAGAR,422605

पाहिजेत
रिसेप्शनिस्ट - २ जागा
डाटा एन्ट्री ऑपरेटर - २ जागा
ओ. टी. टेक्निशियन - २ जागा
डायलिसिस टेक्निशियन - २ जागा
वॉर्ड मॅनेजर - १ जागा
नर्सिंग सुपरवाईझर - २ जागा
नाईट, मॉर्निंग, इव्हीनींग
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

आकर्षक पगारावर जागा भरणे आहे
सुपरवायझर
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वत:ची टु व्हिलर असणे अवश्यक)
ऑफिस असिस्टंट
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
उमंग इन्फ्राटेक
7875455777

पाहिजेत
तरूणांसाठी सुवर्णसंधी
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त होतकरू, तरूणांनी संपर्क साधावा
पुरुष – ४ जागा
(वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
8669184141

फ्लॅट विकणे आहे
- ठिकाण-
दिघी, पुणे, आळंदी रोड, पर्पल ब्लुम सोसायटी, साई पार्क रोड, प्लॉट नं. सी-108
क्षेत्रफळ - 585, फुली फर्निचर, 1 बीएचके 80 स्क्वे फुट बाल्कणी
किचन ट्रॉली, बेड, सोफा, टिव्ही युनिट
8379064040
9960984718

पाहिजेत
दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा
आकर्षक पगार
राजा ड्रेसेस
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
8275191096

स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत
अकाऊंटंट मॅनेजर
अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य
Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक
टिम हाताळण्याची क्षमता असावी
पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॅार्म्स, धुळवड, ता. सिन्नर
- संपर्क - सांगळे साहेब - 9850194463 9503947084

पाहिजेत
रिषभ गोल्ड अँण्ड डायमंड
सल्समन - २
ड्रायव्हर - १
वॉचमेन - १
ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर
9604334777
8669888777

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

जागा विकणे आहे
अतिशय उत्तम लोकेशन तहसील NA असलेली अर्धा गुंठा जागा त्वरीत विकणे आहे
(दोन्ही बाजूने रस्ता)
पत्ता - कचेरी रोड, श्रमिक कॉम्पलेक्स (गोडावून) जवळ, अकोले , जि. अ.नगर
- संपर्क -
7385653323

भाड्याने देणे आहे
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

जागा विकणे आहे
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॅालनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

# लायन्स क्लब ऑफ संगमनेरच्या अध्यक्षपदी ॲड. उदयसिंग ढोमसे

## शैक्षणिक मदत व गरजू महिलांना साड्यांचे वाटप करत नव्या कार्यवर्षाचा प्रारंभ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि समाजोपयोगी उपक्रमांची परंपरा पुढे नेत लायन्स क्लब ऑफ संगमनेरचा शपथविधी सोहळा गुरुवारी, दि. १७ सप्टेंबर रोजी हॉटेल पंचरत्न, अकोले रोड, संगमनेर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी नूतन अध्यक्ष ला. ॲड. उदयसिंग ढोमसे, सचिव ला. सई वैद्य आणि खजिनदार ला. ॲड. गिरीश राजेंद्र मेंद्रा यांच्यासह संचालक मंडळाने लायनिस्टिक वर्ष २०२६-२७ साठी पदाची शपथ घेतली.

शपथविधी अधिकारी MJF ला. डॉ. सुचित गांधी, माजी प्रांताध्यक्ष, डिस्ट्रिक्ट ३२३४-ऊ२ यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना शपथ देत त्यांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली. यावेळी त्यांनी लायन्स क्लबच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांसाठी प्रभावीपणे सेवाकार्य राबविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला MJF ला. चेतन भुतडा, झोन चेअरमन, झोन १५ यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी लायन्स क्लबच्या सेवाकार्यातील सातत्य, नेतृत्वाची भूमिका आणि सामाजिक बांधिलकी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी तत्कालीन अध्यक्ष ला. संजय आसावा यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आपल्या कार्यकाळात क्लबच्या वतीने



राबविण्यात आलेल्या विविध सेवा उपक्रमांचा आढावा त्यांनी यावेळी मांडला. सचिव ला. अमोल खटाटे यांनी मागील वर्षातील क्लबच्या कार्याचा सविस्तर अहवाल सादर केला.

नूतन अध्यक्ष ला. ॲड. उदयसिंग ढोमसे यांनी आगामी कार्यकाळातील क्लबची दिशा स्पष्ट करत त्यांनी सामाजिक गरजा ओळखून अधिकाधिक समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. शिक्षण, गरजू घटकांना मदत आणि समाजातील विविध स्तरांपर्यंत सेवाकार्य पोहोचविण्यावर आगामी काळात भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थिनीला शैक्षणिक मदत; गरजू महिलांना साड्यांचे वाटप- नवीन कार्यवर्षाची सुरुवात केवळ पदग्रहणाने न करता प्रत्यक्ष सेवाकार्याने करण्यात आली. अँग्लो-उर्दू स्कूलमधील इयत्ता दहावीमध्ये प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थिनीला पुढील शिक्षणासाठी आर्थिक मदत देण्यात आली. तसेच गरजू कामगार महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. नव्या कार्यकारिणीने पदभार स्वीकारताच राबविलेल्या या उपक्रमांमुळे क्लबच्या सेवाभावी कार्याची दिशा स्पष्ट झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ला. केदारनाथ राठी यांनी केले, तर नूतन सचिव ला. सई वैद्य यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ला. डॉ. राजन ठाकूर, ललित देसाई, अमोल खटाटे, कुशावर्त कासट, राजेश लाहोटी, प्रकाश कलंत्री, राखी करवा, बबिता आसावा यांच्यासह लायन्स क्लबच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# स्कॉर्पिओतून दारू तस्करीचा पर्दाफाश

युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - घारगाव पोलिसांनी संगमनेर तालुक्यातील बोटा परिसरात कारवाई करत आळेफाटा येथून आंबीदुमाला गावाकडे होणारी बेकायदेशीर दारूची वाहतूक पोलिसांनी उघडकीस आणली. पोलिसांनी स्कॉर्पिओ कारसह ५ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.




काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ कारमधून (एम.एच.१४ सी.सी. ४६०२) अवैध देशी-विदेशी दारूची वाहतूक केली जाणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. बोटा गावाजवळील सर्व्हिस रोडवर सापळा रचून संशयित वाहन अडवून झडती घेतली असता, त्यात विविध कंपन्यांच्या देशी व विदेशी दारूच्या एकूण ४१५ बाटल्या आढळून आल्या. या

कारवाईत कारचालक दौलत साहेबराव महाले (वय ३२) व गणेश पांडुरंग फापाळे (वय ४६, दोघे रा. बेलापूर, ता. अकोले) या दोघांना ताब्यात घेतले. चौकशीत ही दारू आळेफाटा, जुन्नर येथून आणल्याचे त्यांनी सांगितले. गाडी सतीश बाळाजी गागरे यांची असल्याचे निष्पन्न झाले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे व उपविभागीय अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सचिन धनाड, पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद गाडेकर, सुभाष बोडखे यांनी केली.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत निमोण विद्यालयात विद्यार्थ्यांनी साकारला भारताचा भव्य नकाशा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सेवा, समर्पण आणि देशप्रेमाची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजावी या उद्देशाने हरिभाऊ सांगळे यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, निमोण येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अभियानाचा एक भाग म्हणून विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मानवी साखळीच्या माध्यमातून भारताचा आकर्षक आणि भव्य नकाशा साकारला.

विद्यालयाच्या मैदानावर विद्यार्थ्यांनी उभे राहत भारताच्या नकाशाची प्रतिकृती तयार केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी एकता, संघभावना आणि देशाप्रती असलेले प्रेम याचे प्रभावी दर्शन घडविले. या उपक्रमासाठी विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानेश्वर कांबळे सर आणि पर्यवेक्षक बाळनाथ घुगे सर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा संकल्प अभियानांतर्गत वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. भारताच्या नकाशाचे सुंदर रेखाटन विद्यालयाचे कलाशिक्षक सुनील अभियेकर सर यांनी केले. त्यांच्या कलाकौशल्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाले आणि हा उपक्रम अधिक प्रभावीपणे साकार झाला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानेश्वर कांबळे सर यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक करत सेवा, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांच्या माध्यमातून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळनाथ घुगे सर, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या भारताच्या नकाशाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या उपक्रमातून विद्यालयाने देशप्रेम, एकता आणि सामाजिक जाणीवेचा संदेश दिला. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक मूल्ये, राष्ट्रभक्ती आणि सहकार्याची भावना निर्माण करण्याचा विद्यालयाचा प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहे.

# चेक बाऊन्स प्रकरणात कंत्राटदाराला एक वर्षाचा कारावास

## नऊ टक्के व्याजासह रक्कम देण्याचे संगमनेर न्यायालयाचे आदेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - चेक अनादर प्रकरणाची गंभीर दखल घेत संगमनेर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी प्रसाद बी. जोशी यांनी आरोपी संजय मालक सागर याला निगोशिएबल इन्स्टुमेंट्स ॲक्टच्या कलम १३८ अन्वये दोषी ठरवले आहे. न्यायालयाने त्याला एक वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली असून, फिर्यादी कंपनीला दोन लाख रुपये नुकसानभरपाई आणि २ सप्टेंबर २०२६ पासून प्रत्यक्ष वसुली होईपर्यंत वार्षिक नऊ टक्के सरळ व्याजासह रक्कम देण्याचे आदेश दिले आहेत. नुकसानभरपाई न दिल्यास आरोपीला आणखी दोन महिने साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे.

फिर्यादी 'श्री गजानन महाराज शुगर लिमिटेड' या कंपनीकडे आरोपी संजय सागर हा ऊसतोडणी व वाहतूक कंत्राटदार म्हणून कार्यरत होता. २०१७-१८ च्या गाळप हंगामासाठी त्याची नियुक्ती करून लेखी करारानुसार कंपनीने त्याला एक लाख रुपये आगाऊ (ॲडव्हान्स) रक्कम धनादेशाद्वारे दिली होती. मात्र, त्याने कराराप्रमाणे काम न केल्याने आगाऊ रक्कम परत करण्यासाठी स्वतःच्या स्वाक्षरीचा एक लाख रुपयांचा धनादेश दिला होता. खात्यात पुरेशी शिल्लक नसल्याने तो बँकेत अनादरित झाला. कायदेशीर नोटीस बजावूनही मुदतीत रक्कम न मिळाल्याने कंपनीने संगमनेर न्यायालयात




फौजदारी खटला (क्र. ९१९/२०१८) दाखल केला होता. सुनावणीदरम्यान हा धनादेश केवळ सुरक्षेसाठी दिला होता आणि त्याचा गैरवापर झाला, असा बचाव आरोपीने मांडला. मात्र, या समर्थनार्थ कोणताही ठोस पुरावा तो सादर करू शकला नाही. न्यायालयाने कागदोपत्री पुरावे, उलटतपासणी आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीला दोषी ठरवत ही शिक्षा सुनावली.

या प्रकरणात फिर्यादी कंपनीच्या वतीने ॲड. प्रणव श्रीकांत गोंगे यांनी युक्तिवाद केला. त्यांना ॲड. धनश्री राठी, ॲड. परिमल बांबरे, ॲड. सोनाली बोटवे आणि ॲड. चेतन लखवानी यांनी सहकार्य केले.

### दिनविशेष

२०२५: कोलकाता ढगफुटी — पश्चिम बंगालच्या कोलकात्यात ढगफुटीमुळे आलेल्या पुरात किमान १२ लोकांचे निधन.

२०२२: भूतान — कोरोना रोगामुळे दोन वर्षांच्या बंदीनंतर भूतानने आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी पर्यटन पुन्हा सुरु केले.

२०१९: थॉमस कूक ग्रुप कंपनी — या प्रसिद्ध कंपनीने दिवाळखोरी जाहीर केली. किमान ६ लाख प्रवाशी ग्राहक जगभरात अडकले.

२००४: जीन चक्रीवादळा, हैती — वादळामुळे किमान ३ हजार लोकांचे निधन.

२००२: मोझिला फायरफॉक्स — ब्राउजरची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली.

१९८३: संयुक्त राष्ट्र — सेंट किट्स आणि नेव्हिस या देशांचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.

१९४३: दुसरे महायुद्ध — इटालियन सोशल रिपब्लिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाझी कठपुतळी राज्याची स्थापना झाली.

१९३२: सौदी अरेबिया — हेझाझ आणि नेजडचे राज्य मिळून एकत्रीकरण पूर्ण झाले.

### जन्म

१९३१: हिली क्रिस्टल — अमेरिकन व्यापारी, CBGB चे संस्थापक (निधन: २८ ऑगस्ट २००७ )

१९२६: आंद्रे कॅसॅग्नेस — फ्रेंच तंत्रज्ञ आणि खेळणी निर्माते (निधन: १६ जानेवारी २०१३ )

१९२०: भालबा केळकर — नाट्य लेखक व अभिनेते (निधन: ६ नोव्हेंबर १९८७ )

१९१९: देवदत्त दाभोळकर — पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, शिक्षणतज्ञ (निधन: १७ डिसेंबर

१९१७: आसिमा चॅटर्जी — भारतीय रसायनशास्त्र — पद्म भूषण, शांती स्वरूप भटनागर पुरस्कार (निधन: २२ नोव्हेंबर २००६ )

१९१५: क्लिफ र्डशुल — अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ — नोबेल पुरस्कार

१९१४: ओमर अली सैफुद्दीन (तिसरा) — ब्रुनेईचा राजा

१९११: राप्पल संगमेश्वर कृष्णन — भारतीय भौतिकशास्त्रज्ञ

१९०८: रामधारी सिंह दिनकर — हिंदी कवी, निबंधकार, स्वातंत्र्यसैनिक व संसद सदस्य, राष्ट्रकवी म्हणून प्रसिद्ध साहित्यिक व्यक्तिमत्त्व — पद्मभूषण, साहित्य अकादमी, ज्ञानपीठ पुरस्कार (निधन: २४ एप्रिल १९७४ )

### मृत्यू

२०२०: भूपेश पांड्या — भारतीय चित्रपट अभिनेते (जन्म: २० जानेवारी १९७२ )

२०१५: स्वामी दयानंद सरस्वती — भारतीय भिक्षू आणि तत्त्वज्ञ (जन्म: १५ ऑगस्ट १९३० )

२०१२: के. लाल — जादूगार

२००४: डॉ. राजा रामण्णा — शास्त्रज्ञ, अणुऊर्जा आयोगाचे ४ थे अध्यक्ष (जन्म: २८ जानेवारी १९२५ )

१९९९: गिरीश घाणेकर — मराठी चित्रपट, जाहिरातपट निर्माते

१९६४: मामा वरेरकर — नाटककार (जन्म: २७ एप्रिल १८८३ )

१९३९: सिग्मंड फ्रॉईड — आधुनिक मानसशास्त्राचा जनक (जन्म: ६ मे १८५६ )

१९२९: रिचर्ड ॲडॉल्फ झिसिमंडी — ऑस्ट्रियन-जर्मन रसायनशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक — नोबेल पुरस्कार (जन्म: १ एप्रिल १८६५ )

१८८२: फ्रेडरिक वोहलर — जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ३१ जुलै १८०० )

१८७०: प्रॉस्पर मेरिमी — फ्रेंच लेखक, इतिहासकार आणि पुरातत्त्वज्ञ (जन्म: २८ सप्टेंबर १८०३ )

१८५८: ग्रँट डफ — मराठ्यांचा इतिहास लिहिणारे ब्रिटिश अधिकारी (जन्म: ८ जुलै १७८९ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२३ सप्टेंबर**

## २०२५: कोलकाता ढगफुटी — पश्चिम बंगालच्या कोलकात्यात ढगफुटीमुळे १२ लोकांचे निधन

२०२५ मध्ये पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता शहराला अतिवृष्टी आणि अचानक आलेल्या पुराचा मोठा फटका बसला. शहरात अल्पावधीत मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने अनेक भाग जलमय झाले. या घटनेला काही वृत्तांमध्ये ढगफुटीसदृश अतिवृष्टी असे संबोधण्यात आले. मुसळधार पावसामुळे रस्ते, सखल भाग आणि निवासी परिसरात पाणी साचले. या पुरस्थितीत किमान १२ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त समोर आले.कोलकाता हे दाट लोकवस्तीचे आणि मोठ्या प्रमाणावर शहरीकरण झालेले शहर असल्यामुळे मुसळधार पावसाचा परिणाम झपाट्याने जाणवतो. अनेक ठिकाणी पावसाचे पाणी बाहेर जाण्यास पुरेशी व्यवस्था न झाल्याने रस्त्यांवर आणि वस्त्यांमध्ये पाणी साचले. काही भागांमध्ये वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली, तर नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले. अचानक झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील जनजीवन अक्षरशः ठप्प झाले. अनेक वाहनांमध्ये पाणी शिरले. काही ठिकाणी वाहने पाण्यात अडकून पडली. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरही त्याचा परिणाम झाला. रेल्वे आणि रस्ते वाहतुकीला अडथळे निर्माण झाल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणांनी मदतकार्य सुरू केले. स्थानिक प्रशासन, पोलीस आणि बचाव पथकांनी संवेदनशील भागांमध्ये पाहणी केली. नागरिकांना अनावश्यकपणे घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात आले. सखल भागातील नागरिकांना सुरक्षित



ठिकाणी जाण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या घटनेत किमान १२ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त अत्यंत धक्कादायक होते. अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीत वीजपुरवठा, वाहतूक, दळणवळण आणि दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम झाला. काही भागांमध्ये घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या घटनेने कोलकात्याच्या निचरा व्यवस्थेचा आणि शहरी पूर व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला. हवामान बदलामुळे कमी वेळेत मोठ्या प्रमाणात पाऊस होण्याच्या घटना वाढत असल्याचे हवामान तज्ज्ञ सातत्याने सांगत आहेत. अशा परिस्थितीत शहरांमध्ये पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी सक्षम व्यवस्था, सखल भागांचे नियोजन, जलाशयांचे संरक्षण आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अधिक मजबूत करण्याची गरज अधोरेखित झाली. कोलकात्यातील या दुर्घटनेने एक महत्त्वाचा धडा दिला—अल्पावधीत होणारी विक्रमी अतिवृष्टी ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून, शहराच्या पायाभूत सुविधांसाठीही मोठे आव्हान आहे.

## डॉ. राजा रामण्णा : भारताच्या अणुकार्यक्रमाला दिशा देणारे महान शास्त्रज्ञ

**पुण्यतिथी विशेष**

भारताच्या अणुऊर्जा क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचे शास्त्रज्ञ म्हणून डॉ. राजा रामण्णा यांचे नाव आदराने घेतले जाते. अणुशास्त्र, संरक्षण संशोधन आणि वैज्ञानिक प्रशासन या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले. भारताच्या अणुकार्यक्रमाला स्वावलंबी आणि सामर्थ्यशाली बनविण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यांचे निधन २४ सप्टेंबर २००४ रोजी झाले.डॉ. राजा रामण्णा यांचा जन्म २८ जानेवारी १९२५ रोजी कर्नाटकातील तुमकूर येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना विज्ञान आणि विशेषतः भौतिकशास्त्राची आवड होती. त्यांनी उच्च शिक्षण घेतल्यानंतर अणुभौतिकशास्त्राच्या क्षेत्रात संशोधन सुरू केले. पुढे ते भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाशी जोडले गेले आणि देशातील आघाडीच्या वैज्ञानिकांमध्ये त्यांची गणना होऊ लागली.भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाचे जनक मानले जाणारे डॉ. होमी जहांगीर भाभा यांच्या नेतृत्वाखाली रामण्णा यांनी महत्त्वाचे काम केले. भाभा अणुसंशोधन केंद्राशी संबंधित संशोधनामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. अणुऊर्जा आणि अण्वस्त्र संशोधनाच्या क्षेत्रात भारताची वैज्ञानिक क्षमता वाढविण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.१९७४ मध्ये पोखरण येथे भारताने केलेल्या पहिल्या अणुचाचणीत डॉ. राजा रामण्णा यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. 'स्मायलिंग बुद्धा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या अणुचाचणीने भारताच्या वैज्ञानिक आणि संरक्षण क्षमतेचा जगाला परिचय करून दिला. या प्रकल्पाशी संबंधित वैज्ञानिक नेतृत्व आणि तांत्रिक कामामध्ये रामण्णा अग्रभागी होते. त्यामुळे भारताच्या अणुकार्यक्रमाच्या इतिहासात त्यांचे नाव विशेष महत्त्वाचे ठरते.डॉ. रामण्णा यांनी केवळ संशोधन केले नाही, तर वैज्ञानिक संस्थांचे नेतृत्वही प्रभावीपणे केले. त्यांनी भाभा अणुसंशोधन केंद्राचे संचालक म्हणून



काम केले. त्यानंतर भारताच्या अणुऊर्जा आयोगाच्या चौथ्या अध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली. या काळात भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाला संस्थात्मक आणि तांत्रिक बळकटी देण्याचे काम त्यांनी केले.त्यांच्या कार्याचा विस्तार संरक्षण संशोधन क्षेत्रातही झाला. त्यांनी संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेत (DRDO) महत्त्वाची जबाबदारी सांभाळली. भारताच्या संरक्षण तंत्रज्ञानातील स्वावलंबनासाठी त्यांनी प्रयत्न केले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग राष्ट्रीय सुरक्षेसाठी करण्याच्या दृष्टीने त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले.रामण्णा हे केवळ प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञ नव्हते. त्यांना संगीताचीही विशेष आवड होती. ते उत्तम पियानोवादक होते आणि पाश्चात्त्य शास्त्रीय संगीताचा त्यांना गाढा अभ्यास होता. विज्ञानासोबत संगीताची सांगड घालणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत बहुआयामी होते.देशाच्या विज्ञान क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना अनेक सन्मान मिळाले. भारत सरकारने त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या प्रतिष्ठित नागरी पुरस्कारांनी गौरविले.२४ सप्टेंबर २००४ रोजी डॉ. राजा रामण्णा यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारताने एक प्रतिभावान अणुशास्त्रज्ञ, वैज्ञानिक प्रशासक आणि राष्ट्राच्या संरक्षण-विज्ञान क्षेत्राला दिशा देणारे व्यक्तिमत्त्व गमावले.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# दैनिक युवावार्ता कार्यालयात मान्यवरांकडून गणेशाची आरती



## सकारात्मक ऊर्जा हेच यशाचे खरे गमक - उद्योजक गिरीश मालपाणी

संगमनेर - दैनिक युवावार्ता कार्यालयामध्ये विराजमान असलेल्या गणरायाची आरती भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात मालपाणी उद्योजक समूहाचे संचालक तथा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे नूतन संचालक गिरीश मालपाणी, उद्योजक श्रीनिवास भंडारी, माजी नगरसेवक गोरख कुटे, उद्योजक प्रकाश कलंत्री आणि गुंजाळवाडी ग्रामपंचायत सदस्य अतुल अभंग यांच्या हस्ते करण्यात आली.

याप्रसंगी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसनभाऊ हासे व संपादक सौ. सुशीला किसन हासे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास पत्रकार संदीप सातपुते, युवावार्ताचे संचालक तथा महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे नूतन संचालक आनंद हासे, कार्यकारी संपादक सुदीप हासे यांच्यासह युवावार्ता परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना उद्योजक गिरीश मालपाणी म्हणाले, सकारात्मक ऊर्जा हेच यशाचे खरे गमक आहे. कोणत्याही उद्योग-व्यवसायाची वृद्धी साधायची असेल, तर संस्थाप्रमुख, प्रशासन आणि कर्मचाऱ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन व ऊर्जा जोपासणे आवश्यक आहे. त्यातून निश्चितच उद्योग-व्यवसायाची प्रगती आणि भरभराट वेगाने होते. दैनिक युवावार्तानेही आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून सकारात्मक ऊर्जा जपत समाजात स्वतःचा वेगळा ठसा उमटविला असल्याचे त्यांनी सांगितले. 'संगम संस्कृती'पासून सुरू झालेला प्रवास आज 'दैनिक युवावार्ता' आणि 'युवा पॉलीप्रिंट'सारख्या उद्योगांपर्यंत पोहोचला आहे. तसेच रोटरी क्लब, लायन्स क्लब यांसारख्या सामाजिक उपक्रमांमध्ये आनंद हासे व सुदीप हासे यांचा असलेला सक्रिय सहभाग हा सकारात्मक ऊर्जेच्या यशस्वी प्रवासाचे उदाहरण आहे,' असे मालपाणी यांनी नमूद केले. पत्रकारिता, उद्योग-व्यवसाय आणि सामाजिक क्षेत्र या तिन्ही क्षेत्रांचा सुरेख समन्वय साधत युवावार्ता परिवाराने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. समाजाशी नाते जोडत सकारात्मक पत्रकारितेचा वारसा पुढे नेणाऱ्या युवावार्ता परिवाराचे त्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# चाळीस वर्षांचे वाळूचे राजकारण आता थांबवा - आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ज्यांनी चाळीस वर्षे वाळूवर राजकारण केले, त्यांना आता घरकुलांसाठी वाळू मिळू नये, असे वाटत आहे. त्यांना राजकारण करू द्या. यापूर्वी आपण घरकुलांसाठी मोठ्या प्रमाणात वाळू उपलब्ध करून दिली आहे. पुढील टप्प्यातही घरकुलांसाठी वाळू उपलब्ध करून दिली जाईल, असा टोला आमदार अमोल खताळ यांनी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे नाव न घेता लगावला.तालुक्यात सत्ताबदल झाल्यानंतर संगमनेर तालुक्यात सर्वाधिक घरकुले सुरू आहेत, असेही आमदार खताळ यांनी सांगितले.



पंचायत समितीत आढावा बैठक

संगमनेर पंचायत समिती येथे सोमवारी (दि. २१) झालेल्या आढावा बैठकीत आमदार खताळ बोलत होते. या बैठकीत शिक्षण, पाणीपुरवठा, स्वच्छता, घरकुल, आरोग्य, कृषी, रोजगार हमी तसेच ग्रामपंचायत स्तरावरील विविध प्रश्नांचा आढावा घेण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, यांनी स्वागत करून प्रस्ताविक केले होते. यावेळी महायुतीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

आमदार खताळ म्हणाले, यापूर्वी घरकुले देताना अनेक ठिकाणी लाभार्थी निवडीत पक्षपात झाल्याच्या तक्रारी माझ्याकडे येत आहेत. ज्यांना खऱ्या अर्थाने घरकुलाची गरज आहे, असे अनेक नागरिक अद्यापही वंचित आहेत. ज्यांचे दोन मजली घर आहे, अशांनाही घरकुल मिळाल्याचे लोक मला येऊन सांगत आहेत. त्यामुळे यापुढे असे प्रकार होता कामा नयेत. घरकुलासाठी पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव ग्रामविकास अधिकाऱ्यांनी वेळेत सादर करणे गरजेचे आहे. तुमच्याकडून पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव आले नाहीत, तर मला कारवाई करण्यास भाग पाडू नका. कारण आता हे सरकार सर्वसामान्य जनतेचे आहे. आतापर्यंत कागदावरच संगमनेर तालुका चालला; मात्र आता मी प्रत्यक्षपणे लक्ष घातले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांनीही यापुढे आपल्या कामात गांभीर्य आणि पारदर्शकता ठेवावी. असेही त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले, आता काहीजण विनाकारण वातावरण तापविण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र सर्वांनी लक्षात ठेवावे की, हे जनतेच्या हिताचे सरकार आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी काळात संगमनेर तालुका टँकरमुक्त करण्याचा आपला प्रयत्न आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री जयकुमार गोरे, मंत्री योगेश कदम आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुका विकासाचे रोल मॉडेल बनवायचा आहे. अधिकारी, कर्मचारी किंवा नागरिकांना कोणी त्रास देत असेल, तर त्यांनी माझ्याशी संपर्क साधावा. आमदार म्हणून मी त्यांच्या पाठीशी आहे. अशी ग्वाहीही आमदार खताळ यांनी दिली.

### दुष्काळ जाहीर करण्यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली

**पावसाअभावी खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकरी सध्या मोठ्या संकटात सापडला आहे. त्यामुळे संगमनेर तालुक्यात दुष्काळ जाहीर करावा, यासाठी सर्वप्रथम मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यांच्यासमोर तालुक्यातील पावसाची स्थिती, पिकांचे झालेले नुकसान आणि शेतकऱ्यांच्या अडचणींची संपूर्ण माहिती मांडली आहे. शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू आहे. तालुक्यातील खरीप पिकांच्या नुकसानीचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. असे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.**

# राहुल गांधींच्या फोनने बोंद्रेंचा भाजप प्रवेश टळला

मुंबई (वृत्तसंस्था)

काँग्रेसचे माजी आमदार राहुल बोंद्रे यांचा उद्या भाजप प्रवेश होणार होता.मात्र लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी फोनवरून चर्चा केल्यानंतर राहुल बोंद्रे यांनी आपला निर्णय बदलत काँग्रेसमध्येच राहण्याचा निर्णय घेतला आहे. तुमचा फोन आल्यामुळे मी माझा निर्णय बदलत आहे आणि सर्व गमावलं तरी मी तुमच्या सोबत कायम लढत राहील. असेही राहुल बोंद्रे या व्हायरल व्हिडिओत राहुल गांधी यांच्याशी बोलताना पाहायला मिळत आहेत.

या सर्व घडामोडींनंतर राहुल बोंद्रे यांच्या चिखली स्थित निवासस्थानासमोर समर्थकांची मोठी गर्दी जमली आहे. गेल्या दोन महिन्यापासून चिखली मतदारसंघातील राजकारण हा चर्चेचा विषय राज्यभरात ठरला आहे. चिखलीचे काँग्रेसचे माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी काल फेसबुक लाईव्ह करत भाजपमध्ये पक्ष प्रवेश करत असल्याचं जाहीर केले होते.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
※ कर्ज रक्कम वाढ । ※ कर्ज व्याजदर कमी । ※ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait. Neither DO WE
24 तास सुविधांसाठी
02425 - 224761
मोबा. 7038170382
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिमार्जनाय
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25